करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

वर्ष 31 वे

साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com |

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.११३ | पाने-२४ | दि.३/२/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.



आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
9822058106





# वरीष्ठ स्तर न्यायालयाचा शुभारंभ येत्या रविवारी

## उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती चव्हाण व न्यायमुर्ती डिगे येणार

करमाळा : येथील न्यायालयात वरीष्ठ स्तर दिवाणी न्यायालय मंजूर झाले असून त्याचा शुभारंभ येत्या रविवारी ५ फेब्रुवारी सकाळी १०.३० वाजता न्यायालयात होणार आहे. या न्यायालयाचा शुभारंभ उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती पृथ्वीराज चौहान व न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांचे हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ.शब्बीर औटी हे राहणार आहेत. यावेळी जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन येथील पहिले दिवाणी वरीष्ठ स्तर न्यायाधीश उमेश देवर्षी व वकील संघाचे अध्यक्ष ॲड. विकास जरांडे यांनी केले आहे.

> करमाळा येथे दोन्ही दिवाणी न्यायालयात २४५४ दिवाणी खटले प्रलंबीत आहेत. त्यामध्ये एक नंबर कोर्टाकडे १२४२ व दोन नंबर कोर्टाकडे १२१२ खटले आहेत. तर फौजदारी खटले ५३३१ आहेत.त्यामध्ये एक नंबर कोर्टाकडे २४१६ व दोन नंबर कोर्टाकडे २९१५ खटले प्रलंबीत आहेत. तर नव्याने सुरू होत असलेल्या वरीष्ठ स्तर न्यायालयात एकूण १०१६ खटले प्रलंबीत आहेत

करमाळा येथे सन १९७२ पर्यंत फक्त १५ दिवस न्यायालय चालत होते. त्यानंतर येथील न्यायालय हे पुर्ण वेळ सुरू झाले. सध्या येथे दोन न्यायाधीश आहेत. मुख्य न्यायाधीश म्हणून सौ. मीना एखे तर सहदिवाणी न्यायाधीश म्हणून आर.ए. शिवरात्री हे कामकाज पाहत आहेत. याशिवाय नव्याने वरीष्ट स्तर दिवाणी न्यायालय हे ५ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे.

सकाळी साडेदहा वाजता न्यायालयीन आवारात उभारलेल्या कोनशिलेचे अनावरण मा.न्यायमुर्तींचे हास्ते होईल. त्यानंतर प्रत्यक्ष न्यायदान कक्षाचे फीत कापून शुभारंभ करण्यात येणार आहे. त्यानंतर न्यायालय आवारात उभारण्यात आलेल्या सभामंडपात सभेचा प्रारंभ होणार आहे. यावेळी पदाधिकारी, अधिकारी व पक्षकारांनी उपस्थित रहावे असे अवाहन वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड.प्रमोद जाधव यांनी केले.



**घुमरे सर : एक ब्रँडनेम**
(प्रा.प्रदीप मोहिते लिखित लेख)
पान नं.६ वर



झालेला अन्याय अपोआप दुर होत नसतो तर न्याय हा मिळवावा लागतो..

**संपादकीय..................................!**

# न्यायदानाची १३९ वर्षाची परंपरा..!

इतिहास खूप काही सांगतो. १९ व्या शतकातील ही हकीकत. ब्रिटीश कालावधीतील घटना आहे. करमाळा शहर व तालुक्यातील वाढता व्यवसाय, गजबजलेली बाजारपेठ, गरगर फिरणारे साडेतीनशे तेलघाणे, नगरपालिकेचा वाढता व्याप.. या सर्व बाबीमुळे वाद-विसंवाद वाढत होते. वाढत्या व्यवसायात मतभेद आले. जेथे मतभेद आले, तिथे अन्यायाची भावना आली. जेथे अन्याय तेथे न्यायाची गरज असते. अर्थातच न्यायदानासाठी ब्रिटिशांनी सन १८८४ साली करमाळ्यासाठी प्रथम न्यायालय उभारले. करमाळ्याबरोबरच त्यावेळी सोलापूर जिल्ह्यात पाच सहाय्यक सब जज्ज न्यायालये उभारली. या न्यायालयात ५०० पौंड म्हणजे तत्कालीन ५००० रूपया पर्यंतचे दावे चालवता येत होते. सुरूवातीला माढा व करमाळा येथे एकाचवेळी न्यायालय चालू केले ते माढा येथे सुरू होते. न्यायालयातील कामाची स्थिती पाहून तत्कालीन प्रशासनाने या दोन तालुक्यासाठी एकच न्यायाधीश नेमले. करमाळा न्यायालयाचे काम सन १९४८नंतर वाढले. मुंबई शेतकरी कर्जनिवारण कायदा अस्तित्वात आल्यानंतर करमाळा येथील खटले वाढले.

देश स्वतंत्र झाल्यानंतर सन १९५२ ला येथील न्यायालय स्वतंत्ररित्या सुरू झाले. करमाळा न्यायालयाची सुरूवात जुने दत्तमंदिर (दत्तपेठेत) येथे झाली. पुढे या न्यायालयाची जागा बदलली ते दत्त मंदिरातून गुजरगल्लीतील दाळवाले यांच्या वाडयात आले. पहिले जज्ज म्हणून एन.एस.पाठक यांनी काम पाहिले. त्यानंतर एल.डी.शिंदे-धारवाडकर हे जज्ज म्हणून आले. १९५२ ते १९५८ पर्यंत याच जागेत हे न्यायालय चालत होते. १९५८ साली वाय.आर.कुलकर्णी जज्ज असताना न्यायालयाच्या जागेचे स्थलांतर झाले. न्यायालय खाजगी जागेतून किल्ल्यातील शासकीय जागेत आले. त्या जागेत पूर्वी राजा रावरंभा निंबाळकर यांची रंगशाळा होती. त्यानंतर तालुका कचेरी होती, तेथे स्वातंत्र्य चळवळीत जाळपोळ झाली. त्या जागेत पुढे प्राथमिक शाळा भरत असे. त्या जागेतील प्राथमिक शाळा सन १९५८ ला हालवून तेथे न्यायालय सुरू केले. न्यायालय सुरू झाल्यानंतर त्या जागेत पाटबंधारे कार्यालय सुरू झाले होते. पुढे न्यायालय व पाटबंधारे विभाग या दोन विभागात जागेवरून वादावादी सुरू झाली. अखेर वरीष्ठ पातळीवरून या दोन्ही कार्यालयात तडजोड झाली. त्यानूसार निम्मी जागा न्यायालयासाठी व निम्मी जागा पाटबंधारे विभागासाठी देण्याचे ठरले.

सन १९५२ ते १९७२ पर्यंत येथील न्यायालय हे १५ दिवस करमाळा व १५ दिवस माढा येथे चालवले जात असे. सन १९७२ पासून करमाळा येथे पूर्ण वेळ न्यायालय सुरू झाले. करमाळा न्यायमंदिरात अनेक वकीलांचे योगदान आहे. एवढेच नव्हेतर वकील म्हणून अनेक मान्यवरांनी आपली कारकिर्द गाजवली आहे. विशेष म्हणजे भि.ल.कवडी तथा अण्णासाहेब कवडी वकील यांची वकील म्हणून जशी कारकिर्द गाजली तशी त्यांची स्वातंत्र्यसैनिक म्हणून ही कारकिर्द गाजली. वकीली बरोबरच त्यांची स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग फार मोठा होता. त्यांचे कार्यक्षेत्र फक्त करमाळ्या पुरतेच मर्यादीत नव्हते.१९२४ मध्ये महात्मा गांधींनी दांडी यात्रा काढून मिठाचा सत्याग्रह केला. त्यावेळी एका तुकडीचे नेतृत्व कै.अण्णासाहेब कवडी यांनी केले. त्यांनी करातळे येथे भाषण केले. त्यानंतर त्यांना तुरूंगवास पत्करावा लागला होता. त्यानंतर सविनय कायदेभंगाची चळवळ करमाळा येथे राबवली त्यातही ते आघाडीवर होते. १९३९ ते १९४१ या कालवधीत केलेल्या वैयक्तीक सत्यागृहात त्यांचा मोठा सहभाग होता. १९४२ मध्ये ११ ते १३ ऑगस्टला मुंबईमध्ये कॉंग्रेसचे अधिवेशन झाले. त्या अधिवेशनानंतर करमाळा येथे येताच कै.अण्णासाहेबांना अटक झाली होती. स्वातंत्र्य चळवळी नंतर त्यांनी गोवा मुक्तीसंग्रमातही भाग घेतला होता. २५ जून१९५५ ला गोवामुक्तीसाठी जनसंघाने जे आंदोलन केले, त्यातील एका तुकडीचे नेतृत्व कै.अण्णासाहेबांनी केले. स्वातंत्र्यनंतर ते जनसंघात गेले व ते राज्याचे उपाध्यक्ष होते. याप्रमाणेच येथील गुगळे वकील, आर.एम.शास्त्री, जी.डी.पाठक, एन.के.कटारे, आर.बी. कुलकर्णी या जुन्या वकीलांनी आपली कारकिर्द गाजवली होती. यानंतर पुढच्या पिढीतील कै.हरीदास देवी, कै.टी.जी.देवी, कै.व्ही.आर.दिवाण यांच्यासह कै.लाला राठोड यांनी न्यायदानातील दिलेले योगदान महत्वाचे आहे. नवीन इमारतीला जागा मिळवून देण्यामध्ये ॲड.टि.जी.देवी यांचे मोठे योगदान आहे. कै.ॲड.पाटील, कै.ॲड.ठोंबरे, कै.एम.एन. कटारे, कै.ॲड.नानासाहेब घाडगे, कै.ॲड.व्ही.एस.चौधरी, कै.ॲड.ज्ञानदेव देवकर, कै.ॲड.सुंदरदास निकम यांच्या आठवणी ताज्या आहेत. अलीकडील काळातील ॲड.एन.डी रोकडे, ॲड.सुखलाल लुणावत या ज्येष्ठांचे काम लक्षणीय आहे. याच न्यायालयातून ॲड.पुजारी, ॲड. शास्त्री हे दिवाणी न्यायाधीश झाले तर ॲड.राहुल रोकडे हे जिल्हा न्यायाधीश झाले आहेत. या न्यायलयात एस.एच.शहा, विलास शहा, श्री.ठोकडे, श्री.कुंभकोणी यासह अनेक दिग्गज वकीलांनी करमाळा येथे कामानिमित्ताने भेटी दिल्या आहेत.

करमाळा न्यायालयासाठी किल्ल्यातील जुनी इमारत दिली होती. ती जागा अपुरी तर पडत होतीच, परंतू जागोजागी गळत होती. पक्षकारांना पावसात निवारा नव्हता. न्यायालयातील कागदपत्रे भिजत होती. याकरीता करमाळ्याला स्वतंत्र न्यायालय व्हावे; अशी वकील वर्गाची इच्छा होती. त्यानूसार सातत्याने पाठपुरावा केला जात होता. अखेर त्यास उच्च न्यायालयातून हिरवा कंदील दाखवला. त्यानंतर जागेचा प्रश्न निर्माण झाला. करमाळा नगरीतील तत्कालीन नगराध्यक्ष कै.गिरधरदास देवी यांच्यासमोर सर्व वकीलांनी विशेषत: त्या काळातील वकील संघटनेचे अध्यक्ष कै.ॲड.टी.जी. देवी यांनी हा प्रश्न मांडला. त्यास श्री. देवी यांनी अनुकुलता दाखवली व नगरपालिकेच्या मालकीची सध्या इमारत असलेली जागा दाखवली. तहसील कार्यालय, पंचायत समिती, पोलीस कार्यालय, विश्रामगृह, महाविद्यालय व गावापासून अलिप्त आणि बसस्थानकापासून जवळ न्यायालयास उपयुक्त अशी ही जागा असल्याने ती सर्वांनाच पसंत पडली. त्यानंतर पालिकेने १ हेक्टर १६ आर जागेचा अनुकूल ठराव दिल्यानंतर सार्वजनीक बांधकाम विभागाने राज्य शासनाकडे त्या जागेचा प्रस्ताव देऊन तिची किंमत ठरवून पालिकेला ती किंमत दिली. त्यानंतर न्यायालयासाठी सदरची जागा उपलब्ध झाली. त्यानंतर इमारत बांधकामासाठी बरीच धावपळ करावी लागली. तत्कालीन आमदार कै.दिगंबरराव बागल यांच्या कारकिर्दीत या इमारत बांधकामाला मान्यता मिळाली. यासाठी माजी राज्य मंत्री दिलीप सोपल यांचे सहकार्य लाभले आहे. त्यानंतर पुढील तत्कालीन आमदार जयवंतराव जगताप यांच्या कारकिर्दीत या इमारतीला निधी मिळाला तसेच त्यांनी स्थानिक निधीतून रस्त्यासाठी मदत केली आहे. १२०१ क्षेत्रफळ असलेल्या या इमारतीत मुख्य दिवाणी न्यायाधीश कक्ष, सहदिवाणी न्यायाधीश कक्ष, ग्रंथालय, विश्रांती कक्ष, उपहारगृह आदी बाबीचा समावेश आहे. या इमारत निधीसाठी तत्कालीन जिल्हा न्यायाधीश डी.एन.आदमाने यांचे योगदान मिळाले तसेच करमाळा येथील तत्कालीन न्यायाधीश आर.आर.काकाणी, न्यायाधीश किरण बागी, न्यायाधीश जी.पी.देशमुख यांच्यासह नव्याने आलेले न्यायाधीश टी.के.जगदाळे यांचे योगदान लाभले होते. या बांधलेल्या इमारतीसाठी १ कोटी ३७ लाख ८५ हजार रूपये खर्च झाला आहे. सुरूवातीचे काम मे.पटणी इंजिनिअर्स यांनी काम केले. उर्वरीत सर्व काम बार्शी येथील एस.पी.काळेल यांनी पूर्ण केले. याकामी अधिक्षक अभियंता व्ही.के.पवार, कार्यकारी अभियंता बी.एन.बहिर, सरदेशमुख, राजेश पाटील व यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक अभियंता एस.बी.बळी यांनी काम पूर्ण केले आहे.

या नवीन न्यायमंदिराचा शुभारंभ ४ ऑक्टोबर २००९ रोजी तत्कालीन उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती डी.बी.भोसले यांच्या हस्ते झाला. त्यावेळी जिल्हा न्यायाधीश डी.एन.आदमाने, वकील संघाचे अध्यक्ष एस.के.कोकीळ व करमाळ्याचे न्यायाधीश टी.के. जगदाळे हे उपस्थितीत होते. करमाळा न्यायालय नवीन इमारतीत सुरू झाल्यानंतर काही दिवसानी चार न्यायाधीश कार्यरत होते. पुढे यातील दोन न्यायाधीशांची संख्या कमी झाली व पुन्हा दोन न्यायालय कायम कार्यरत राहिले. येथे न्यायाधीश एस.व्ही.जाधव, पी.व्ही. बुलबुले, जे.जी.पवार,काहीकाळ श्री. चव्हाण, एल.सी.वाडीकर, महेश जोशी, बी.डी.पंडीत, शरद देशपांडे, संग्रामसिंह जाधव, प्रशांत घोडके या न्यायाधीश मंडीळीची परंपरा आहे.

करमाळा येथे वरीष्ठ स्तर न्यायालय नसल्यामुळे तालुक्यातील अनेक खटले बार्शी येथील वरीष्ठ स्तर न्यायालयात प्रलंबित होते. यासाठी पक्षकार आणि वकील यांना मोठी धावपळ करावी लागत होती. हे लक्षात घेऊन करमाळा वकील संघाने वरीष्ठ स्तर न्यायालय करमाळा येथे येण्याकामी सातत्याने पाठपुरावा केला व त्याला यश मिळाले. याबाबत पूर्वीचे जिल्हा न्यायाधीश एम.आर.देशपांडे यांचे सहकार्य मिळाले; पण सर्वात जास्त योगदान विद्यमान जिल्हा न्यायाधीश डॉ.शब्बीर औटी यांचे आहे. त्यांनी अफाट मेहनत करून, सर्वांना प्रोत्साहीत करून हे यश मिळवून दिले आहे. याकामी सुरूवातीपासून शेवटच्या मंजुरीपर्यंत आमदार संजयमामा शिंदे यांनी विशेष लक्ष देऊन व पाठपुरावा करून शासन दरबारातून सर्व प्रकारची मदत व निधी मिळवून दिला आहे. याबरोबरच करमाळा येथील न्यायाधीश प्रशांत घोडके तसेच न्यायाधीश सौ.मीना एखे यांचेही मोठे सहकार्य मिळाले आहे.

यातूनच करमाळा येथील वरीष्ठ स्तर न्यायालयाचा शुभारंभ येत्या रविवारी ५ फेब्रुवारी २०२३ रोजी उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती पृथ्वीराज चौहान व न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांचे हस्ते होत असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ.शब्बीर औटी हे राहणार आहेत. पहिले दिवाणी वरीष्ठ स्तर न्यायाधीश म्हणून उमेश देवर्षी हे कामकाज पाहणार आहे. एकंदरीत १३९ वर्षाचा आढावा मांडणे सोपे नाही पण त्याचा प्रयत्न केला आहे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)




आपण दिलेल्या विकासाच्या दृष्टीकोनातूनच, आज आम्ही आमची पाऊले टाकीत आहोत ।
'मामा' तुम्ही दिलेल्या आदर्शानूसार भावी जीवनाची वाटचाल करत आहोत ॥

लोकनेते व माजी राज्यमंत्री

# स्व.दिगंबररावजी बागल (मामा)

यांच्या १७ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !

**शोकाकुल**

**श्री आदिनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आदिनाथनगर**
प्राचार्य - कांतीलाल माने (सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद)

**प्रगती विद्यालय, मांगी** प्राचार्या - अनुपमा देवकर (सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद)

**दिगंबरराव बागल माध्य.विद्यालय, कुंभेज** मुख्याध्यापक- हनुमंत पाटील (सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद)

**दिगंबरराव बागल मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, आदिनाथनगर** पो.जेऊर, ता.करमाळा.

# ८ ते १० फेब्रुवारी धर्मवीर आनंद दिघे करमाळा फेस्टीव्हल



करमाळा(सं.प्र.) : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे व चि.रूद्राशु श्रीकांत शिंदे यांच्या संयुक्त वाढदिवसा निमित्त ८ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी या दरम्यान धर्मवीर आनंद दिघे करमाळा फेस्टीव्हलचे आयोजन करण्यात आले आहे; अशी माहिती बाळासाहेबांची शिवसेना चे जिल्हा प्रमुख व फेस्टीव्हलचे आयोजक महेश चिवटे यांनी दिली.

करमाळा फेस्टीव्हल मध्ये ८ ते १० फेब्रुवारी सलग तीन दिवस सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत भव्य मोफत आरोग्य शिबीर व नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर श्रीदेवीचामाळ रोड, पेट्रोलपंपा समोर, शाहूनगर करमाळा येथे होणार आहे.

८ फेब्रुवारीला सायंकाळी ६ ते १० या वेळेत राज्यस्तरीय ग्रुप डान्स स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेत प्रथम बक्षीस २१ हजार रूपये, द्वितीय बक्षीस १५ हजार रूपये, तृतीय बक्षीस ११ हजार रूपये, उत्तेजनार्थ बक्षीस ३ हजार रूपये ठेवण्यात आले आहे. तसेच करमाळा शहर व तालुक्यातील ६ ते १४ वयोगटातील स्पर्धकांची डान्स स्पर्धा ही घेण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस ७ हजार रूपये, द्वितीय बक्षीस ५ हजार रूपये, तृतीय बक्षीस ३ हजार रूपये व उत्तेजनार्थ बक्षीस ५०० रूपये ठेवण्यात आले आहे. वरील स्पर्धेचे उद्घाटन बाळासाहेबांची शिवसेनेचे युवा नेते पृथ्वीराज शिवाजीराव सावंत व टायगर ग्रुपचे अध्यक्ष तानाजी जाधव यांचे हस्ते होणार आहे.

९ फेब्रुवारीला सायंकाळी ६ ते १० या वेळेत राज्यस्तरीय सोलो डान्स स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस २१ हजार रूपये, द्वितीय बक्षीस १५ हजार रूपये, तृतीय बक्षीस ११ हजार रूपये, उत्तेजनार्थ बक्षीस ३ हजार रूपये ठेवण्यात आले आहे या स्पर्धेचे उद्घाटन वाकाव ग्रापंचायतीचे सरपंच ऋतुराज शिवाजीराव सावंत यांचे हस्ते होणार आहे.

१० फेब्रुवारीला सायंकाळी ६ ते १० या वेळेत महिलांसाठी न्यु होम मिनिस्टर ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन बाळासाहेबांची शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत, मिनाक्षीताई शिवाजीराव सावंत, मायाताई रामदास झोळ यांचे हस्ते होणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना सोन्याची नथनी, पैठणी, फ्रीज, स्मार्ट मोबाईल, एलईडी, मिक्सर, गॅस शेगडी अशा विविध वस्तू बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहे.

वरील स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी नाव नोंदणीसाठी रोहित वायभासे (९०६७१७१५१४), प्रियंका गायकवाड (९६५७७९८१७९), नलिनी जाधव (९४२२ ४२२५३६), अंजली श्रीवास्तव (७७०९ ४६४६५३), भागवत मॅडम (८८८८१ ४८०४०), अक्षय कांबळे (८०८७५४ ५६१०), इम्रान शेख (८६००२५०७०१), जयराज चिवटे (९९७५ ९२३१०१), विशाल गायकवाड (९८८१४९४६५०) येथे संपर्क साधावा. तरी जास्तीत जास्त स्पर्धकांनी वरील स्पर्धेत सहभागी व्हावे; असे आवाहन फेस्टीव्हलचे आयोजक महेश चिवटे यांनी केले

# सरपंचासाठी मिळणारे मानधन जि.प.शाळेला देणार : श्री.झोळ



करमाळा(सं.प्र.): वाशिंबे येथील लोकनियुक्त नूतन सरपंच तानाजीबापू यांनी २६ जानेवारी रोजी झालेल्या ग्रामसभेमध्ये सरपंचासाठी मिळणारे पाच वर्षातील मानधन जिल्हा परिषद शाळेला देण्याचा एक आदर्श निर्णय घेतला आहे. यावेळी श्री.झोळ यांनी सांगितले, की राजकारणात मी ज्यांना नेता म्हणून काम करतो ते करमाळा आमदार संजयमामा शिंदे यांनी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना त्यांनी मानधन न घेता ते समाजहितासाठी वापरले. तोच आदर्श घेत मी माझ्या पाच वर्षाच्या सरपंच पदाच्या कार्यकाळामधील सर्व मानधन वाशिंबे जिल्हा परिषद शाळेसाठी देण्याचा निर्णय घेत आहे. ज्या शाळेत माझी लहान बहिण शिक्षण राज्यसेवेतून उत्तीर्णय होऊन केंद्रीय उपवनसंरक्षक पदापर्यंत पोहचली. असेच विद्यार्थी या शाळेत घडावेत. यासाठी सर्वोतोपरी मदत करणार आहे. तसेच भविष्यकाळात रस्ते, आरोग्य, पाणी, वीज याबाबत ठोस निर्णय गावच्या विकासासाठी घेण्यात येतील; असे सांगितले.झोळ यांच्या निर्णयाचे ग्रामस्थांसह पंचक्रोशीतून स्वागत होत आहे.

**प्लॉट विकणे आहे**

करमाळा न.पा.हद्दीतील खुली जागा २६७.६७ चौ.मी. (जुने दुर्गा पॅलेसजवळ) योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे

• संपर्क : मो.9270496867, 7057258385

करमाळा भूषण



स्व.गिरधरदास देवी



## जाहीर आभार



चेअरमन



श्री.कन्हैयालाल देवी

करमाळा शहराची आर्थिक नाडी असलेली व अनेक बेरोजगारांना रोजगार देणारी करमाळा अर्बन बँक कोरोना काळात अडचणीत आली. बँकेने ज्यांना कर्जरूपी आर्थिक मदतीचा हात दिला त्या कर्जदारांनीच बँकेकडे पाठ फिरवली. त्यामुळे बँकेचा एन.पी.ए वाढून बँकेवर आर्थिक निर्बंध आले. बँकेचे आर्थिक व्यवहार अडचणीत आले. आर्थिक सक्षम असलेले कर्जदारही मुद्दाम कर्ज भरण्यास टाळाटाळ करतात, बँकेने आपल्याला पडत्या काळात साथ दिली; हे ही ते विसरतात याचे वाईट वाटते. अडचणीत आलेल्या बँकेकरीता अनेक सभासदांच्या संचालकांच्या व करमाळा शहरातील नागरीकांना विनंती करून बँकेचे शेअर्स घेऊन भांडवल वाढविण्याकरीता विनंती केली. खूपच चांगला प्रतिसाद सभासदांनी दिला. त्यामुळे sep/dec ला बँक plus networth झाली. थकीत कर्जदारांवर जप्तीसारखी कारवाई करावी लागली. त्यांचा रोष, नाराजी पत्करावी लागली. एवढा खटाटोप फक्त गोरगरीबांच्या आर्थिक मदतीला धावणाऱ्या करमाळा अर्बन बँकेला आर्थिक अडचणीतून वाचविणे एवढेच उद्दीष्ट होय. बँकेच्या सर्व सभासदांनी व करमाळा शहरातील सर्व नागरीकांनी पुन्हा माझ्यावर व माझ्या सहकाऱ्यांवर बँक बिनविरोध करून विश्वास टाकून बँकेला नवसंजीवनी देण्याची जबाबदारी टाकलेली आहे. आमचा सत्कार करू नका, बिनविरोध निवडले गेलो म्हणून कौतूक करू नका, १) बँकेचे भाग भांडवल वाढविणे कामी मदत करा. २) आपल्याकडे, आपल्या मित्राकडे, आपल्या गल्लीतील, आपल्या नातलगाकडे असणारी बँकेची थकीत कर्जे लगेच भरा ! कारण हे केल्याने करमाळा अर्बन बँक पुन्हा आपल्या सेवेला खंबीरपणे उभे राहणार आहे. माझे अथवा माझ्या सहकाऱ्यांचे सत्कार–अभिनंदन करून बँकेस काही फायदा होणार नाही. मी व माझे बिनविरोध निवडलेले **राजकुमार नेमचंद दोशी, दिलीप शांतीलाल कटारिया, प्रकाश मोतीलाल सोळंकी, महादेव आजिनाथ फंड, कलिम अब्दुल रशीद काझी, सुनिल रामभाऊ घोलप, अभिजीत अनिल वाशिंबेकर, गोरख मच्छिंद्र जाधव, चंद्रकांत पांडुरंग चुंबळकर, मोहिनी माधवराव भणगे, सौ.सुनिता कन्हैयालाल देवी, सौ.प्रज्वला विजयकुमार दोशी, सौ.आशा प्रकाश क्षीरसागर, सौ.वंदना सुनिल कांबळे** हे सहकारी आजपासूनच बँकेला गतवैभव प्राप्त करण्यासाठी कामाला लागलो आहे. मार्च २०२३ बँकेच्या लेखा परिक्षणानंतर बँक पूर्व पदावर येईल; असा ठाम विश्वास व्यक्त करतो व भविष्यात आपणही आम्हाला सहकार्य करताल; अशी आशा करतो. पुन्हा सर्व सभसदांचे आभार !

**...श्री.कन्हैयालाल देवी (चेअरमन, करमाळा अर्बन बँक)**


युवा नेतृत्व
8 Feb
श्री कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे संचालक
समाजशील नगरसेवक
मा.हाजी अल्ताफशेठ तांबोळी यांना
वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
पैलवान ग्रुप करमाळा.


विद्या विकास मंडळाचे सचिव व आमचे मार्गदर्शक
मा.श्री.विलासरावजी घुमरे (सर)
आपणांस ६८ व्या वाढदिवसानिमित्त...
6 Feb
हार्दिक शुभेच्छा
जिल्हा समन्वयक
प्रा.लक्ष्मण राख सर
कमिटी सदस्या
प्रा.सौ.सुजाता भोरे मॅडम
कमिटी सदस्य
प्रा.विलास मारकड
कमिटी सदस्य
प्रा.श्रीकांत कांबळे सर
कमिटी सदस्य
प्रा. बिभिषण मस्कर सर
कमिटी सदस्य
प्रा.एम.डी.जाधव सर
NATIONAL SERVICE SCHEME
रक्तदान
जीवन दान
स्वच्छ भारत
शुभेच्छुक
राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तर, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा.

# घुमरे सर - एक ब्रँडनेम



प्रस्तुत लेख हा श्री.विलासराव रामचंद्र घुमरे तथा घुमरे सर यांची स्तुती नसून वस्तुस्थिती दर्शविणारा लेख आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

मनुष्य जीवनात सर्वात अवघड गोष्ट कोणती असेलतर ती 'नाव कमावणे' ही आहे. आज करमाळा तालुक्यात किंबहुना सोलापूर जिल्ह्यात घुमरे सर हे नाव सर्वपरिचित असे नाव आहे. घुमरे सर या नावाच्या उच्चाराबरोबरच नजरेसमोर उभे राहते एक राजबिंडे, रूबाबदार व्यक्तिमत्व. 'बस्स नाम ही काफी है' या हिंदी डायलॉगला साजेसे असे घुमरे सर हे नाव आहे. सोलापूर जिल्ह्यातील जनजीवनाच्या, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रांवर स्वत:च्या कर्तृत्वाचा अमिट ठसा उमटविणारे ऊर्ज्वस्वल आणि लोकादरास पात्र झालेले घुमरे सर हे नाव. सर जेंव्हा परिस्थितीने उभ्या केलेल्या कोणालाही कळू न देता झुंजत होते तेव्हांही सामान्य नाम नव्हते. हे नाव नेहमीच विशेष नाम म्हणून घेतले जाते किंबहुना सरांवर प्रेम करणाऱ्या व असंख्य चाहत्यांच्या दृष्टीने ते एक भाववाचक नाम होऊन राहिले आहे.

किंगमेकर, मार्गदर्शक, चाणक्य, बॉस, कुटूंबप्रमुख, आराध्य दैवत या विशेषणांपासून सरांच्या जीवनाची यशस्वी वाटचाल लोकप्रियतेच्या उत्तुंग शिखरावर पोहोचली आहे. आता घुमरे सर नामक एक लोकप्रिय ब्रँडनेम जनमाणसात रूढ झाले आहे. हेच त्यांनी जीवनात मिळविलेले सर्वोच्च यश आहे. अर्थात स्वत:चे नाव जनमाणसावर कोरले जाणे ही सामान्य बाब नव्हे त्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम, त्यांनी सोसलेले परिस्थितीच्या टाकीचे घाव, संघर्षावर केलेली मात हे सर्व केवळ कल्पनातीत आहे.

सरांचा पिंड राजकीय आहे हे संपूर्ण जिल्हा जाणतो. जिल्ह्यातील अनेक मातब्बर राजकीय नेत्यांच्या व्यक्तिगत व राजकीय जीवनात एक खंबीर आधारस्तंभ म्हणून सरांना मानाचे अढळ असे स्थान आहे.

या व्यतिरिक्त नामविस्तार पूर्व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.अरूण अडसूळ, प्रसिध्द साहित्यिक डॉ.राजेंद्र दास, मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये स्वत:ची वेगळी प्रतिमा निर्माण केलेल सिनेदिग्दर्शक नागराज मंजुळे, सुप्रसिध्द कविवर्य डॉ.सुरेश शिंदे, बँकिंग क्षेत्रातील जाणकार चंद्रशेखर शिलवंत, डॉ.अनिल व्होटकर, उद्योजक कलीम काझी, पत्रकार डॉ.बाबुराव हिरडे, अण्णा काळे, उद्योजक पंढरीनाथ साटपे, कृषीभूषण आनंद कोठडिया या व अशा अनेक मित्रांच्या प्रेमामुळे सरांचे आणि सरांची या मित्रांना लाभत असलेल्या जिंदादिल मैत्रीमुळे या सर्व मित्रांचे जीवन या प्रदीर्घ स्नेह रज्जूच्या गोड बंधनामुळे अनोख्या आनंदाने ओथंबून गेले आहे. आपल्या अकृत्रिम मैत्रीमुळे मित्रांच्या जीवनात आनंद फुलवणारा मित्र, गरजूंना मदतीचा हात देणारा दाता, अनेकांचे संसार सुखाचे करणारा त्राता आणि आपल्या अनुभवजन्य मार्गदर्शनाने अनेकांना कसोटीच्या प्रसंगातून सहीसलामत बाहेर काढणारा नेता अशा अनेक रूपांनी अनेकांच्या जीवनामध्ये सरांचे स्थान परम आदराचे राहिले आहे. काळाचा अचूक वेध घेण्याची दृष्टी, काटेकोर नियोजन व प्रभावी अंमलबजावणी करण्याची कुशलता, धाडसी निर्णयक्षमता आणि सर्वांगीण प्रगतीचा ध्यास असणाऱ्या घुमरे सरांनी सध्या राजकारणा पेक्षा समाजकारणाला प्राधान्य दिले.

करमाळा तालुक्याच्या विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या 'विद्या विकास मंडळ' संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाची धुरा गेली २७ वर्षे ते सांभाळत आहेत. या संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील युवा पिढीला दर्जेदार उच्च शिक्षण मिळाले पाहिजे; या मुद्यावर त्यांनी विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. शहरी भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ज्या सोयी सुविधा मिळतात त्याच किंबहुना त्याहीपेक्षा अधिक उच्च दर्जाच्या सोयी सुविधा आणि कला व क्रीडा गुणांना वाव देणारे उच्च शिक्षण मिळावे हा त्यांचा आग्रह आहे. आणि त्याचा प्रत्यय दिवसेंदिवस प्रगतीपथावर वाटचाल करणाऱ्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या विकसित रूपाने तालुक्यास आणि जिल्ह्यास पाहावयास मिळत आहे. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर नुकत्याच पार पडलेल्या विद्यापीठस्तरीय क्रिकेट स्पर्धा हे याचे बोलके उदाहरण आहे.

घुमरे सर यांनी संस्थेच्या माध्यमातून जे शैक्षणिक कार्य हाती घेतलेले आहे त्याकामी त्यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, उपप्राचार्य कॅप्टन संभाजी किर्दाक आणि डॉ.अनिल साळुंखे हे परिश्रम घेत आहेत. दुर्दम्य इच्छाशक्ती आणि उच्च कोटीतील आत्मविश्वास, आपला मुद्दा पटवून देणारे विलक्षण संवाद कौशल्य आणि सत्याला सामोरे जाण्याचे असामान्य धाडस हे घुमरे सरांच्या व्यक्तिमत्वाचे ठळक गुणविशेष. या गुणवैशिष्ट्यांमुळे कोलंबसाच्या गर्वगीताला साजेल, अशाच पध्दतीने आज ६८ व्या वाढदिवशीही घुमरे सर 'अनंत आमुची ध्येयासक्ती' असे नियतीला ठणकावून सांगत आहेत. तरूणाला लाजवेल अशा ताकदीने आणि हिमतीने तालुक्याच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटत आहेत. तेव्हा अशा यशवंत आणि समृध्दी व प्रतिष्ठाप्राप्त घुमरे सरांच्या जीवनामध्ये शेकडो शरद ऋतू यावेत आणि त्यांचे अवघे जीवन शरदाच्या चांदण्याने न्हाऊन निघावे; हीच त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मंगलमय सदिच्छा!

**...प्रा.प्रदीप बबनराव मोहिते**
(मराठी विभागप्रमुख, य.च.महाविद्यालय करमाळा)


## शहिद मेजर अमोल निलंगे यांच्या स्मृतिदिनानिमित्त
# सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा गौरव



करमाळा(सं.प्र.) : साडे येथे शहिद मेजर अमोल निलंगे यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ.निलेश मोटे, सचिन गाडेकर, संजय साळुंखे यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशकल्याणीचे संस्थापक अध्यक्ष गणेश करे-पाटील हे होते. प्रमुख पाहूणे म्हणून ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष डॉ.अ‍ॅड.बाबूराव हिरडे उपस्थित होते. माजी सैनिक संघटनेचे उपाध्यक्ष अरूणकुमार तळीखेडे यांचे हस्ते ध्वजारोहण झाले तर सैनिक संघटनेचे दिपकराजे शिर्के, रावसाहेब साळुंखे, अक्रूर शिंदे हे व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी शहिद निलंगे यांच्या स्मारकाचे पूजन करून पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शहिद कुटूंबियांचा सन्मान करण्यात आला. निलंगे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित निबंध व चित्रकला स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीसे देऊन गौरविण्यात आले. शहिदांच्या स्मृती जपल्या पाहिजेत, अशाप्रकारची भावना अध्यक्षीय मनोगतातून करे-पाटील यांनी व्यक्त केली.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सचिन गाडेकर यांनी केले तर आभार संदीप ठाकर यांनी मानले.

इथं सौंदर्य जन्म घेतं..
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा मो.9172092187
होलसेल साडी डेपो
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
साड्यांचा भरपूर स्टॉक व
भरपूर व्हरायटीमध्ये उपलब्ध !
घरगुती विक्रीसाठी साड्या होलसेल दरात मिळतील
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
अ‍ॅड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186


आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
fastrack
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.

मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२






**मा.श्री.ना.एकनाथजी शिंदे** (मुख्यमंत्री, म.राज्य), **मा.श्री.श्रीकांत एकनाथजी शिंदे** (खासदार)
**चि.रूद्रांश श्रीकांत शिंदे** यांचे संयुक्त वाढदिवसानिमित्त

# धर्मवीर आनंद दिघे करमाळा फेस्टीव्हल

• बुधवार दि.८ फेब्रुवारी २०२३ ते शुक्रवार दि.१० फेब्रुवारी २०२३ •

## भव्य मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबीर

बुधवार, दि.८ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ पर्यंत

## राज्यस्तरीय ग्रुप डान्स स्पर्धा

बुधवार, दि.८ फेब्रुवारी रोजी सायं. ६.०० ते १०.००

- **प्रथम बक्षीस : रू.२१०००**
- **द्वितीय बक्षीस : रू.१५०००**
- **तृतीय बक्षीस : रू.११०००**
- **उत्तेजनार्थ : रू.३०००**

## डान्स स्पर्धा

(करमाळा शहर व तालुक्यासाठी वयोगट ६ ते १४)

- **प्रथम बक्षीस : रू.७०००**
- **द्वितीय बक्षीस : रू.५०००**
- **तृतीय बक्षीस : रू.३०००**
- **उत्तेजनार्थ : रू.५००**

<u>शुभहस्ते</u> : **श्री.पृथ्वीराज शिवाजीराव सावंत**(युवा नेते, बाळासाहेबांची शिवसेना)
**श्री.तानाजी(भाऊ) जाधव** (टायगर ग्रुप, म.राज्य)

## राज्यस्तरीय सोलो डान्स स्पर्धा

गुरूवार, दि.९ फेब्रुवारी रोजी सायं. ६.०० ते १०.००

- **प्रथम बक्षीस : रू.२१०००**
- **द्वितीय बक्षीस : रू.१५०००**
- **तृतीय बक्षीस : रू.११०००**
- **उत्तेजनार्थ : रू.३०००**

<u>शुभहस्ते</u> : **श्री.ऋतुराज शिवाजीराव सावंत** (सरपंच- ग्रा.पं.वाकाव, ता.माढा)

## न्यु होम मिनिस्टर

शुक्रवार, दि.१० फेब्रुवारी रोजी सायं. ६.०० ते १०.००

<u>शुभहस्ते</u> : **श्री.शिवाजीराव सावंत** (जिल्हा संपर्कप्रमुख - बाळासाहेबांची शिवसेना)
**सौ.मिनाक्षीताई शिवाजीराव सावंत, सौ.मायाताई रामदास झोळ**

**• नांवनोंदणीसाठी संपर्क...**

रोहित वायभासे(९०६७१७१५१४), सौ.प्रियंका गायकवाड (९६५७७९८१७९)
सौ.नलिनी जाधव(९४२२४२२५३६), सौ.अंजली श्रीवास्तव(७७०९४६४६५३)
भागवत मॅडम (८८८८१४८०४०), अक्षय कांबळे (८०८७५४५६१०)
इम्रान शेख (८६००२५०७०१), जयराज चिवटे(९९७५९२३१०१), विशाल गायकवाड (९८८१४९४६५०)

**• स्थळ...**

**श्रीदेवीचामाळ रोड, पेट्रोलपंपा समोर, शाहूनगर, करमाळा.**



**आयोजक : मा.श्री.महेश(दादा) चिवटे**
**सोलापूर जिल्हाप्रमुख (बाळासाहेबांची शिवसेना)**



संचालक, करमाळा अर्बन बँक
आशिर्वाद
आशिर्वाद
संचालक, करमाळा अर्बन बँक
कै.गिरधरदास देवी
कै.शांतीलाल कटारिया
दि करमाळा अर्बन को.ऑप.बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत
श्री.कन्हैयालाल गिरधरदास देवी
श्री.दिलीप शांतीलाल कटारिया
यांची संचालक पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल तसेच देवी गटाच्या सर्व नूतन संचालकांचे
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
• शांती मोबाईल शॉपी, समस्त मारवाड गल्ली, करमाळा.
• कटारिया ब्रदर्स चे कर्मचारी व मित्रपरिवार, करमाळा.




विद्या विकास मंडळाचे सचिव व आमचे मार्गदर्शक
मा.श्री.विलासरावजी घुमरे सर यांना ६ फेब्रुवारी रोजी असलेल्या ६८ व्या वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
प्रा.विलास मारकड(सर)
प्रा.एम.डी.जाधव(सर)
प्रा.बी.एच.मस्कर(सर)




6 Feb
ॲड.विक्रांत घुमरे
श्री.आशुतोष घुमरे
आमचे मार्गदर्शक
6 Feb
मा.विलासरावजी घुमरे(सर)
यांना वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा
श्री.ज्ञानेश पाटोळे
(मा.चेअरमन, विलासराव घुमरे पतसंस्था)
(व्यवस्थापक, दिगंबरराव बागल पेट्रोलियम)
शुभेच्छुक
किल्ला विभाग मित्र मंडळ
करमाळा

## भाजपाचे गणेश चिवटे यांनी जिल्हा नियोजन मधून

# करमाळा तालुक्यासाठी ४९ लाख रू.ची कामे केली मंजूर



करमाळा(सं.प्र.) : भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे यांची गेल्या महिन्यामध्ये जिल्हा नियोजन समितीवर निवड झाली आणि अवघ्या एक महिन्याच्या आत चिवटे यांनी सोलापूर जिल्हा नियोजन समितीच्या जनसुविधा व नागरी सुविधा अंतर्गत करमाळा तालुक्यासाठी ४९ लाख रूपये निधी मंजूर करून आणला आहे. यामध्ये खडकेवाडी येथे गावांतर्गत सिमेंट काँक्रीटीकरण, भालेवाडी येथे आरो प्लॅन्ट तसेच वीट, करंजे, रोशेवाडी, मोरवड, पिंपळवाडी, वंजारवाडी, हिवरवाडी, देवळाली, हिसरे, फिसरे येथे गावांतर्गत वाडी वस्त्यांवरील रस्ते मंजूर करून आणले आहेत.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर, जिल्हाध्यक्ष सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा तालुक्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून हा निधी मंजूर झाला आहे.यापुढेही करमाळा तालुक्यासाठी जास्तीत जास्त निधी मिळवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती गणेश चिवटे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. चिवटे यांनी ग्रामीण भागातील गरजेचे रस्ते मंजूर केल्यामुळे नागरीकांकडून त्यांचे कौतूक होत असल्याचे दिसून येत आहे.


डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना **श्रीजय नेत्र रूग्णालय**

**डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे** (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A

करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.

**वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध**

**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)

**श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९१२१०१३४९३**



# प्लॉट विकणे आहे

गणेशनगर मधील केमिस्ट भवन जवळ १८४० स्क्वे.फूट एन.ए. खुला प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहे

**संपर्क : मो.नं.९८८१२९३५८९**


# शंभुराजे जगताप यांचेकडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



करमाळा(सं.प्र.): पाल्यांच्या भवितव्यासाठी पालकांनी दूरदृष्टी ठेवून गावच्या विकासासाठी लोकसहभागातून सहकार्य करावे. कोर्टी गावच्या विद्यार्थ्यांना भविष्यातही सर्वतोपरी मदत करू. गरज पडल्यास केव्हाही आवाज द्या, मदतीसाठी सदैव तत्पर राहू; असे प्रतिपादन जगताप गटाचे युवा नेते शंभुराजे जगताप यांनी केले.

कोर्टी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप कार्यक्रमात जगताप बोलत होते.कोर्टी जि.प.शाळेने बालिकादिनानिमित्त स्नेहसंमेलना चे औचित्य साधून शंभुराजे जगताप यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित केले होते. त्यावेळी मार्गदर्शन करताना शंभुराजे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करू; असे आश्वासन दिले होते. तो दिलेला शब्द पाळत शंभुराजे यांनी प्रत्यक्ष २५ जानेवारी रोजी शाळेत येऊन वह्या, पेन सारख्या अत्यावश्यक शैक्षणिक शालेय साहित्याचे वाटप केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीमंत झाकणे, उपाध्यक्ष इक्बाल इनामदार, सागर शेटे, मनोज धुमाळ, अमोल काळे, प्रितम कुटे, विदेश साळुंके, शुभम कात्रेला, मुख्याध्यापक विशाल शहाणे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक सहशिक्षिका लक्ष्मी बहिर यांनी केले. सुत्रसंचालन सचिन नवले यांनी केले तर आभार संतोष महाडिक यांनी मानले.


आशिर्वाद



स्व.दिगंबरराव शंकरराव काळे



6 Feb



श्री.मिलींद फंड सर | उपप्राचार्य संभाजीराव किर्दाक सर | श्री.राजेंद्र साळुंके (सर)

विद्या विकास मंडळाचे सचिव व आमचे मार्गदर्शक
**मा.श्री.विलासरावजी घुमरे(सर)** यांना ६८ व्या वाढदिवसानिमित्त... **हार्दिक शुभेच्छा !**

शुभेच्छुक

**शिवसाई अर्थमुव्हर्स**





- जेसीबी, ट्रॅक्टर योग्य दरात भाड्याने मिळेल.
- शेतीविषयक सर्व कामे योग्य दरात करून मिळतील.
- ओंकार गुरव(मो.९५५२२५५०७८)

**संपर्क : मो.७०२८७०७०१०/९४२२४२२२१०/९९७०६६४३४३/९८५०३७३९३३**

**सागर झेरॉक्स ॲन्ड जनरल स्टोअर्स,** वायसीएम कॉलेज समोर, करमाळा. **प्रोप्रा : सागर काळे, श्रीकांत काळे**

**कल्पवृक्ष वीटभट्टी** करमाळा-हिवरवाडी रोड, सहारा इंग्लीश स्कुल समोर, करमाळा.


चवीचा शोध इथे संपतो..!
स्वादीष्ट, रूचकर शुध्द शाकाहारी
जेवण व नाष्ट्याची उत्तम सोय !
श्री गणेश
फॅमिली रेस्टॉरंट
शुध्द शाकाहारी
साऊथ इंडियन डिशेस
स्पंच डोसा
चीज उत्तप्पा
टोमॅटो उत्तप्पा
कट डोसा
वडा सांबर
इडली वडा
शाबु वडा
नाष्टा वेळ...
सकाळी ८ ते सायं ८
महाराष्ट्रीयन डिशेस
पंजाबी डिशेस
• पनीर मसाला • व्हेज मराठा
• काजु मसाला • व्हेज भुना
जेवण वेळ : सकाळी ११ ते रात्री ११
• फॅमिली व महिलांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था
• प्रशस्त पार्किंग सुविधा • पार्सल सुविधा उपलब्ध
टीप : सर्व प्रकारच्या शुभकार्यासाठी जेवण व नाष्ट्याची ऑर्डर स्विकारली जाईल.
प्रोप्रा : ममदापुरे ब्रदर्स. फोन-220320
गणेश ममदापुरे (9922264931)
दिनेश ममदापुरे (9730961492)
पत्ता : महावीर उद्यान जवळ, जेऊर रोड, करमाळा.


आधारस्तंभ
विश्वस्त
अध्यक्ष
सहसचिव
प्राचार्य
उपप्राचार्य
यशवंत परिवाराचे आधारस्तंभ, विद्या विकास मंडळाचे सचिव
मा.श्री.विलासराव घुमरे (सर) यांना ६८ व्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
चेअरमन
प्रा.हनुमंत भोंग सर
व्हा.चेअरमन
प्रा.कृष्णा कांबळे
सचिव
श्री.शरद देवकर
संचालक
डॉ.अतुल लकडे
संचालक
श्री.प्रमोद शेटे
संचालक
प्रा.रमेशकुमार व्यवहारे
संचालक
प्रा.राहूल श्रीरामे
संचालिका
प्रा.सौ.सुजाता मोरे
संचालक
श्री.ज्ञानेश्वर कबाडे
संचालिका
सौ.राजश्री पाटोळे-शिंदे
संचालक
श्री.अशोक फुटाणे
6 Feb
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सेवकांची सह.पतसंस्था मर्या; करमाळा (सर्व सभासद व कर्मचारी वृंद)

# अर्थसंकल्पातील निर्णय साखर कारखान्याच्या दृष्टीने हिताचा : श्री.बागल

करमाळा(सं.प्र.) : केंद्र सरकारने सहकारी साखर कारखान्यांनी प्रलंबित असलेल्या एस.एम.पी व एफ.आर.पी. पेक्षा अधिक दर दिला होता. त्यावरील आकारण्यात येणाऱ्या प्राप्तीकरातून कारखान्यांना सवलत देण्याचा यावर्षीच्या अर्थसंकल्पातील महत्वपूर्ण निर्णय हा सहकारी साखर कारखान्याच्या दृष्टीने हिताचा व नवसंजीवनी देणार आहे; असे प्रतिपादन मकाई कारखान्याचे चेअरमन दिग्विजय बागल यांनी केले.

याबाबत प्रतिक्रिया देताना श्री.बागल म्हणाले, की सहकारी साखर कारखान्यांनी एसएमपी व एफआरपी पेक्षाही जादा दर दिला होता. त्या कारखान्यांना प्राप्तीकर आकारणी होणार होती. परंतू शेतकरी सभासदांना ऊसासाठी जादा दर देणे हे कारखान्याचं कर्तव्य होतं आणि त्यावर प्राप्तीकर म्हणजे इन्कम टॅक्स आकारणे हे खेदजनक होते. परंतू चालू वर्षाच्या (२०२३-२४) अर्थसंकल्पात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी सहकारी साखर कारखान्यांना प्राप्ती करातून सवलत देऊन एक ऐतिहासिक व सहकार क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सन २०१६-१७ या वर्षापर्यंत भरण्यात आलेल्या प्राप्तीकराचा परतावा कारखान्यांना केला जाईल. या निर्णयामुळे सहकारी साखर कारखान्यांना १० हजार कोटी रूपयाहून अधिक फायदा होणार आहे. वास्तविक पाहता सहकारासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ११५० कोटीची तरतूद केली आहे. मात्र गतवर्षीच्या म्हणजे २०२२-२३ चे अर्थसंकल्पात हीच तरतूद १६०० कोटी रूपयांची होती. शासनाच्या सहकार ते समृध्दी योजने अंतर्गत अनेक सहकारी संस्थांना वेगवेगळ्या माध्यमातून मदत होणार आहे.

देशातील शेतकऱ्यांसाठी देखील यंदाच्या अर्थसंकल्पात १.३२ लाख कोटी रूपयांची भरवी तरतूद वेगवेगळ्या माध्यमातून केली आहे. विशेष म्हणजे युवा शेतकऱ्यांसाठी व जे नवीन ॲग्री स्टार्टअप करू पाहत आहेत, त्यांना प्रोत्साहन व चालना देण्यासाठी ॲग्रीकल्चरल एक्सीलेटर फंड या योजनेद्वारे विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. तसेच दूध व मत्स्य व्यवसायासाठी चांगल्या योजना व तरतूद यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. या सर्व बाबी पाहता सहकार व शेतकऱ्यांना अनुकूल व प्रोत्साहनात्मक अर्थसंकल्प जाहीर झाल्याने सर्वत्र समाधान वाटत असल्याची प्रतिक्रिया शेवटी श्री.बागल यांनी दिली आहे.

# विजय कोळेकर यांना आदर्श शिक्षक व मुख्याध्यापक पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) : रावगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय कोळेकर हे इंग्रजी विषयाचे शिक्षक म्हणून पाचवी ते दहावीच्या वर्गाकरीता अध्यापन करतात. तसेच मुख्याध्यापक पदाची जबाबदारी चोखपणे पार पाडत आहेत. या त्यांच्या कार्यामुळे इंग्रजी अध्यापक मंडळ करमाळा व यशकल्याणी सेवाभावी संस्था यांचे तर्फेआदर्श शिक्षक व आदर्श मुख्याध्यापक असा दुहेरी पुरस्कार विजय कोळेकर यांना प्रदान करण्यात आला. यावेळी गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, गटविकास अधिकारी मनोज राऊत, इंग्रजी पाठ्यपुस्तक मंडळ सदस्या श्रृती चौधरी, इंग्रजी अध्यापक जिल्हा संघटनेचे अध्यक्ष मूचंडे सर, तालुका अध्यक्ष कल्याणराव साळुंके, सचिव लावंड, ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष ॲड.बाबूराव हिरडे, यशकल्याणीचे गणेश करे-पाटील आदी उपस्थित होते.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
मो.9423222266, 9604762600
डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
उपलब्ध सुविधा...
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर • एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
- जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार • लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स् आमच्याकडे नंबरचे चष्मे व गॉगल्स योग्य दरात मिळतील.
बॅंक ऑफ इंडिया शेजारी, बसस्टॅन्ड समोर, करमाळा. प्रोप्रा : वर्षा गायकवाड मो.९५२७२६८१८१/७७५६८२५८२६




आमचे दैवत
"माझं आणि देवाचं एक सुंदर नातं आहे
जिथे मी जास्त मागत नाही व
देव मला कधीच कमी पडू देत नाही..!"
मा.श्री.
विलासरावजी घुमरे सर
आपणास
उदंड आयुष्याच्या अनंत
शुभेच्छा..!
शुभेच्छुक
श्री.विजयसिंह साळुंके, श्री.प्रमोद होनराव, श्री.राहूल घुमरे, श्री.शरद देवकर, श्री.राहुल बाबर
श्री.नितीन इंदुरे, श्री.गणेश जाधव, श्री.आशीर खान, श्री.नवनाथ बिनवडे



प्रोप्रा : सागर वाघमारे Mo : 8600350856
शाखा नं.१०
एम.टेक.डिस्ट्रीब्युटर्स
Sales & Services
सर्व प्रकारच्या ॲक्सेसिरीज
ॲन्टीव्हायरस, वायफाय राऊटर, रिफिलींग, नेटवर्किंग इ.
प्रकारची कामे करून मिळतील.
होलसेल रेटनूसार साहित्य उपलब्ध !
आमच्याकडे सर्व प्रकारचे
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
विक्री व दुरूस्ती करून मिळेल.
HP, DELL, ASUS, LENOVO, ACER, HIKVISION
CP-PLUS, EPSON, SAMSUNG
पत्ता
आदित्य प्लाझा, भवानीनाका, संताजीनगर, दुधे CT स्कॅन शेजारी, करमाळा.


संचालक, करमाळा अर्बन बँक
हार्दिक अभिनंदन !
संचालिका, करमाळा अर्बन बँक
दि करमाळा अर्बन को.ऑप.बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत
श्री.दिलीप शांतीलाल कटारिया व
सौ.आशा प्रकाश क्षीरसागर
यांची बँकेच्या संचालक पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
नंदन प्रतिष्ठान, करमाळा.


लोकविकास डेअरी
लोकविकास
ड्रायफ्रुटस् अँन्ड मसाले
दत्तपेठ, करमाळा., जि.सोलापूर
• शुध्द तुप • जिरा ताक
• दही • मलई पेढा
• दूध • गुलाबजामून
• श्रीखंड • आईसक्रीम
• आम्रखंड • सोनपापडी
• बासुंदी • बिस्किट
• लस्सी • फरसाण
• पनीर • ग्रीनपीस(मटार)
• बटर • मिक्सव्हेज इ.
दैनंदिन गरजेचे खाद्य पदार्थ मिळेल !
वरील सर्व पदार्थांची होलसेल विक्री
टीप : शुभकार्याच्या ऑर्डर स्विकारल्या जातील.
एकवेळ अवश्य भेट द्या !
प्रोप्रा : परदेशी बंधू (9112040504, 9096822550)


श्री जगदंबा टूर्स अँन्ड ट्रॅव्हल्स्
पांडे, ता.करमाळा., जि.सोलापूर
आपल्या लाडक्या मुला-मुलीच्या लग्नाच्या शुभकार्यासाठी किंवा इतर समारंभासाठी ४० प्रवासी सीट असलेली टाटा बस
भाड्याने मिळेल
आमच्याकडे क्रुझर तसेच ईरटिगा व स्विफ्ट डिझायर इ. गाड्या योग्य दरात भाड्याने मिळतील.
करमाळा - पुणे - करमाळा डेली बससेवा
लवकरच आपल्या सेवेत..!
जाण्याचा मार्ग : वीट, कोर्टी, कुंभारगाव, जिंती, भिगवण, हडपसर, स्वारगेट, शिवाजीनगर, काळेवाडी, डांगे चौक
• पार्सल सेवा व महिलांसाठी राखीव सीट
• वेळ : सकाळी ५ वा. ४५ मि.
• ठिकाण : करमाळा एस.टी.स्टॅन्ड समोर, हॉटेल मुक्ताई शेजारी., करमाळा.
संपर्क
प्रशांत कांबळे (9921404775 / 7057067003)
संतोष कांबळे (7741020164), किरण कांबळे (9822285691)


6 Feb
आमचे मार्गदर्शक
मा.श्री.विलासरावजी घुमरे (सर)
आपणांस वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
प्रा.ज्ञानदेव कुंभार सर
प्रा.विजयकुमार शहाणे
प्रा.संजय पाटील
प्रा.युवराज घनकुटे


एस.एस.के.एस. असोसिएटस्
अकौंट मॅनेजर पाहिजेत
सीए फर्म मध्ये अकौंटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)
पदासाठी अटी खालीलप्रमाणे..
• कामाची वेळ : सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार ॲडजेस्ट)
• पात्रता : कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे) संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
• पगार : ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.
संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)
पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टासमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.
टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.


6 Feb
आमचे मार्गदर्शक
मा.विलासरावजी घुमरे(सर)
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
• गणेश जाधव
• आशिर खान

### तब्बल बारा वर्षानंतर
# पुनर्वसित सीना-कोळगाव धरणग्रस्तांची मंत्रालयात बैठक

करमाळा(सं.प्र.) : सीना-कोळगाव धरणामध्ये संपादित झालेल्या कोळगाव, हिवरे, आवाटी, निमगाव या गावांतील ७३२ शेतकऱ्यांच्या पर्यायी जमिनी मिळण्यासंदर्भात पुनर्वसनमंत्री शंभुराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या पुढाकारातून मुंबई मंत्रालय येथे पार पडली. या बैठकीत पुनवर्सनमंत्र्यांची येत्या दोन दिवसात राज्याच्या महाधिक्काचा सल्ला घेऊन निर्णय घेऊ; अशी ग्वाही देसाई यांनी दिली.

आधी पुनर्वसन मग धरण.. असा शासनाचा नियम आहे. परंतू अद्याप सीना-कोळगाव धरणग्रस्त शेतकरी पर्यायी जमिनीपासून वंचित आहेत. शासनाने शेतकऱ्यांना आधी नोटीसा देऊन ६५ टक्के रक्कम भरायला सांगितली. परंतू शेतकऱ्यांना ६० दिवसानंतर संपादन झालेल्या जमिनीचा मोबदला मिळाला. यामध्ये शासनाकडून झालेली चूक गेल्या २५ वर्षापासून सीना-कोळगाव धरणग्रस्त शेतकरी सोसत आहेत. आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी हिवाळी अधिवेशनानंतर लक्षवेधी उपस्थित करून हा विषय लावून धरला होता. त्या अनुषंगाने ही बैठक पार पडली.

माजी आमदार नारायण पाटील यांनी काहीही मार्ग काढून तालुक्यातील प्रश्नावर मार्ग काढण्याची विनंती मंत्रीमहोदयांना केली होती यावर येत्या दोन दिवसात राज्या महाधिक्क्त्यांचा सल्ला घेऊन योग्य निर्णय घेऊ; असा शब्द शंभुराज देसाई यांनी दिला होता. यावेळी मदत व पुनर्वसन विभागाचे सचिव, संबंधित अधिकारी, अजित तळेकर, पुनर्वसित शेतकरी नितीन पाटील, नंदकुमार पाटील, विकी मोरे, संभाजी नीळ, शिवाजी शिंदे, उत्तम शिंदे उपस्थित होते.

**सा.संदेश वार्षिक वर्गणी १५० रू.**




# अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांची नुकसान भरपाई शेतकऱ्यांना तातडीने द्यावी : नानासाहेब मोरे

करमाळा : अतिवृष्टीमुळे करमाळा तालुक्यात झालेल्या नुकसानीची भरपाई शासनाने शेतकऱ्यांना तातडीने द्यावी; अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहरप्रमुख नानासाहेब मोरे यांनी केली आहे. याबाबत माहिती देताना मोरे म्हणाले, की करमाळा तालुक्यात आठ मंडलातील ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान झालेल्या २५ हजार हेक्टर नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे केलेले आहेत. परंतू याची अद्याप भरपाई सरकारने शेतकऱ्यांना दिलेली नाहीमिळालेल्या माहितीनूसार ४८ कोटी ५९ लाख रूपये भरपाई मिळावी; असा अहवाल तहसीलदार समीर माने यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे दिला आहे. झालेल्या अतिवृष्टीत उडीद, सुर्यफूल, मका, केळी, द्राक्षे, भाजीपाला आदी पिकांचे नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांचे पंचनामे करून दोन महिने होत आलेतरी अजून शेतकऱ्यांपर्यंत मदत मिळालेली नाही. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे व पिकाचे आतोनात नुकसान झाले आहे. एवढेच नाहीतर रब्बीच्या पिकांवर देखील परिणाम झाला आहे. त्यामुळे सरकारने जिरायत पिकांना हेक्टरी १३ हजार रूपये व बागायतीसाठी हेक्टरी २७ हजार व फळबागांना हेक्टरी ३६ हजार मदत जाहीर केलेली आहे. परंतू ही मदत अद्याप पर्यंत शेतकऱ्यांना मिळालेली नाही. तालुक्यातील आठ मंडल मधील २५ हजार हेक्टर क्षेत्र नुकसानग्रस्त झाले आहे. या क्षेत्रासाठी तहसील कार्यालयकडून ४८ कोटी ५९ लाख रूपयाचा अहवाल जिल्हाधिकारीयांना पाठविण्यात आला आहे. शेतकरी नुकसान भरपाई मिळेल; या आशेवर वाट पाहत बसले आहेत. तरी शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई द्यावी अन्यथा मनसे तर्फे आंदोलन करण्याचा इशारा मोरे यांनी दिला आहे.






विद्या विकास मंडळाचे सचिव
व आमचे मार्गदर्शक

# मा.विलासरावजी घुमरे (सर) यांना

६८ व्या वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

6 Feb



प्रा.विजय रोडगे (सर)

शुभेच्छुक

● युनिसोर्स इन्फ्रास्ट्रक्चर्स, प्रा.लि., ● शिवराय बचत गट, भोसे

---

आमच्या असोसिएशनचे
मार्गदर्शक

## मा.विलासरावजी घुमरे (सर)

यांना ६ फेब्रुवारी रोजी
असलेल्या ६८ व्या
वाढदिवसास लाख.. लाख..

हार्दिक शुभेच्छा



| अध्यक्ष | सचिव | सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य |
|---|---|---|---|---|---|
|  |  |  |  |  |  |
| विनोद चव्हाण | बाळासाहेब होसिंग | अनिल मंगवडे | जयराम सोरटे | आण्णासाहेब जाधव | विवेक भोसले |

| सदस्य | सदस्य | सदस्य |
|---|---|---|
|  |  |  |
| स्वप्निल सालगुडे | किरण रोकडे | मोहनराव टिकोरे |

शुभेच्छुक

**करमाळा तालुका मंगल कार्यालय असोसिएशन**

सर्व पदाधिकारी, चालक-मालक व सभासद

---

# ईशा आय केअर & ऑप्टिकल



**उपलब्ध सुविधा**

- कॉम्प्युटरद्वारे डोळे तपासणी
- मोतीबिंदू, काचबिंदू निदान
- कॉन्ट्रॅक्ट लेन्स क्लिनिक
- नंबरचे चष्मे अर्जंट तयार करून मिळतील.
- सर्व प्रकारचे गॉगल

महात्मा ज्योतिबा फुले जन-आरोग्य योजने अंतर्गत
खाजगी दवाखान्यात
मोफत उपचार व मोफत शस्त्रक्रिया उपलब्ध !

**करमाळा तालुक्यातील सर्वात सुसज्ज व ब्रँडेड चष्मा व गॉगल शोरूम**

तरी एकवेळ अवश्य भेट द्या !

**पत्ता : भवानीपेठ, BIO बँक ATM समोर, करमाळा.**
मो.9970930153


## तांबोळी परिवाराचे सामाजिक उपक्रम



कोरोना काळात गोरगरीबांना किराणा किट व धान्य वाटप करताना अमीर तांबोळी



कोविड योध्दा पुरस्कार तत्कालीन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांचे हस्ते स्विकारताना उस्मानशेठ तांबोळी











विद्या विकास मंडळाचे सचिव व आमचे मार्गदर्शक
मा.श्री.विलासरावजी घुमरे (सर)
यांना दि.६/२/२०२३ रोजी असलेल्या ६८ व्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,करमाळा
शुभेच्छुक
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा.
(सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद)
सुरताल संगीत विद्यालय, करमाळा.
(प्राचार्य बाळासाहेब नरारे)




जय महाराष्ट्र पतसंस्थेचे चेअरमन, क.न.प.चे नगरसेवक
युवा नेतृत्व
मा.हाजी अल्ताफशेठ तांबोळी
यांना दि.८ फेब्रुवारी रोजी असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
रहेबर ग्रुप
करमाळा

# कमलाभवानी शुगरचे प्रदूषण तातडीने बंद करावे : श्री.जगताप



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरालगत असलेल्या श्रकमलाभवानी शुगरचे प्रदुषणामुळे नागरीकांना अरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तरी तातडीने प्रदुषण बंद करावे; अशी मागणी माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की करमाळा शहरालगत कमलाभवानी शुगर प्रा.लि.पांडे हा साखर कारखाना असून सदर साखर कारखान्याने प्रदुषण नियंत्रण यंत्रणा कार्यान्वीत केलेली नसल्याने या कारखान्यातून मोठ्या प्रमाणावर राख व काजळी बाहेर पडून आसपासच्या परिसरात सर्वत्र पसरत आहे. सदर कारखाना शहरालगत व श्री कमलादेवी मंदिर परिसराजवळ आहे. या ठिकाणी दाट लोकवस्ती आहे. या कारखान्यातून तयार होणाऱ्या राखेचे लोट संपूर्ण करमाळा शहरात व घराघरात पडत असून, यामुळे नागरीकांना श्वसनाचे आजार बळावले आहेत. सर्वसामान्य जनतेच्या स्वच्छतेचा व आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तरी या बाबीची गंभीर दखल घेवून तातडीने या शुगर फॅक्टरीने प्रदुषण नियंत्रण यंत्रणा बसवली आहे का ? असल्यास ती कार्यान्वीत आहे का ? नसल्यास त्वरीत प्रदुषण बंद करण्याबाबतच्या उपाययोजना करण्याबाबत आपले स्तरावरून सूचना देवून कार्यवाही करावी. त्याचबरोबर सदर कारखान्यातून मळी मिश्रीत पाण्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावली जात नसल्यामुळे आसपास मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत आहे. परिसरातील पाण्याच्या स्त्रोताचा दर्जा खालावला असून शेतजमिनींचा पोत खराब होत आहे. या बाबींचा गांभीर्याने विचार करून प्रदुषण बंद करण्याबाबत तातडीने आदेश द्यावेत. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री व उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांना दिल्या आहेत.

# प्रिंटिंग क्षेत्रातील व्यावसायिक राजशेखर पुराणिक यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील प्रिंटिंग क्षेत्रातील व्यावसायिक राजशेखर पुराणिक यांचे १ फेब्रुवारीला सोलापूर येथे उपचार घेत असताना निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुन असा परिवार आहे. गुजरगल्ली येथे अजय प्रिटिंग प्रेस नावाने त्यांचे दुकान आहे. गेली अनेक वर्षे ते आजारी होते. त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचे निधन झाले. अंत्यविधीला सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल हळहळ व्यक्त होत आहे.

# अडसुळ परिवाराकडून हळदी-कुंकू कार्यक्रमाद्वारे पर्यावरणपूरक व स्वच्छतेचा संदेश



करमाळा (सं.प्र.) : अडसुळ परिवाराच्या वतीने भोसे येथे महिलांसाठी हळदी-कुंकू व तिळगुळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी साधनाताई अडसुळ यांचे हस्ते हळदी-कुंकू, तीळगुळ व वाण देण्यात आले. वाण म्हणून पर्यावरणपूरक डब्याची पिशवी व स्वच्छतेचा संदेश देत कचरा भरण्याची सुपली महिलांना देण्यात आली. यावेळी महिलांची उखाणे स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमास भोसे परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

**ओजस हॉस्पिटल**

OJS HOSPITAL

AIIOPATHY ◂ AYURVED ◂ HOMEOPATHY

**डॉ.रोहन रामदास कुंभार**
B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ

**डॉ.मनोज रामदास कुंभार**
M.D. कन्सलटींग फिजीशीयन

**डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार**
B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट

✻ वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ ✻
✻ २४ तास अत्यावश्यक सेवा ✻

**डॉ.सौ.सायली मनोज कुंभार**
M.sc. Biotech, Health & Nutrition आहारतज्ञ

**ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी** शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार ● हृदयरोग व उच्च रक्तदाब ● मधुमेह ● थायरॉईड ● संधिवात ● पोटाचे आजार ● स्त्रियांचे आजार ● श्वसनसंस्थेचे आजार ● मणक्यांचे व हाडांचे विकार ● मुतखडा ● मुळव्याध ● सौंदर्य समस्या ● त्वचारोग व केशविकार ● आहारविषयक मार्गदर्शन..

उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा)
Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत)
PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test
(गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)

पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. ● संपर्क : मो.9960334005, 9423333950

संचालक, करमाळा अर्बन बँक



श्री.दिलीप शांतीलाल कटारिया

**हार्दिक अभिनंदन !**

दि करमाळा अर्बन को.ऑप.बँकेच्या
पंचवार्षिक निवडणुकीत
**श्री.दिलीप शांतीलाल कटारिया**
**सौ.प्रज्वला विजयकुमार दोशी**
यांची बँकेच्या संचालक पदी
बिनविरोध निवड झाल्याबद्दल
**हार्दिक अभिनंदन !**

संचालिका, करमाळा अर्बन बँक



सौ.प्रज्वला विजयकुमार दोशी

शुभेच्छुक

● संजय कटारिया ● परेश दोशी ● मनोज गांधी ● दिपक कटारिया ● इक्बाल खान
● राजेंद्र कटारिया ● सुधीर घोडके ● नितीन दोशी ● विजय दोशी ● गिरीष दोशी

# करमाळा अर्बन बँक निवडणूक - १५ सदस्य बिनविरोध

करमाळा (सं.प्र.) : येथील दि करमाळा अर्बन को.ऑप.बँकेची निवडणूक बिनविरोध झाली असून, १५ सदस्य बिनविरोध निवडले आहेत; अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दिलीप तिजोरी यांनी दिली आहे.

करमाळा अर्बन बँकेची १५ जागेसाठी निवडणूक लागली होती. या १५ जागेसाठी २२ अर्ज दाखल झाले होते. त्यामध्ये छाननी प्रक्रियेत १४ अर्ज शिल्लक राहिले होते. आज (ता.३०) उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. या दिवशी सर्वसाधारण मतदार संघात १०, महिला प्रतिनिधी २ आणि इतर मागासप्रवर्ग प्रतिनिधी १, अनुसूचित जाती जमाती प्रतिनिधी १ आणि भटक्या विमुक्त जाती जमाती मतदार संघातून असे १५ अर्ज शिल्लक राहिल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली आहे.

**सर्वसाधारण प्रतिनिधी मतदार संघातून** मोहिनी माधवराव भणगे, राजकुमार नेमचंद दोशी, कन्हैयालाल गिरधरदास देवी, महादेव आजिनाथ फंड, ॲड.सुनील रामभाऊ घोलप, आशा प्रकाश क्षीरसागर, दिलीप शांतीलाल कटारे, कलिम अब्दुल रशीद काझी, प्रकाश मोतीलाल सोळंकी, अभिजीत अनिल वाशिंबेकर. **महिला प्रतिनिधी मतदार संघातून** सुनिता कन्हैयालाल देवी, प्रज्वला विजयकुमार दोशी. **इतरमागास प्रवर्ग प्रतिनिधी मतदार संघातून** चंद्रकांत पांडूरंग चुंबळकर. **अनुसूचित जाती जमाती मतदार संघातून** वंदना सुनील कांबळे. भटक्या विमुक्त जाती जमाती व विशेष मागास प्रवर्ग मतदार संघातून गोरख मच्छिंद्र जाधव हे उमेदवार बिनविरोध निवडले आहेत. या सर्व उमेदवारांच्या निवडीची घोषणा सहाय्यक निबंधक दिलीप तिजोरी यांनी केली आहे.

गेल्या महिन्याभरापासून करमाळा अर्बन बँक निवडणुकीची चर्चा शहरभर चालू होती. ३० जानेवारी रोजी सर्व निवडणूक प्रक्रिया पार पडून ही निवडणूक बिनविरोध झाली आहे. ही निवडणूक बँकेचे चेअरमन कन्हैयालाल देवी यांचे नेतृत्वाखाली बिनविरोध झाली आहे. या निवडीने श्री.देवी यांचेवर असलेला बँकेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार यांचा असलेला विश्वास पुन्हा एकदा स्थापित झाला आहे.



करमाळा अर्बन बँकेच्या निवडणुकीत सभासद, ठेवीदार, कर्जदार व सर्व कर्मचारी यांनी जो विश्वास दाखविला आहे, त्या विश्वासास पात्र राहून यापुढेही बँकेचा कारभार पारदर्शकपणे व विश्वासदर्शक पध्दतीने चालू राहिल. सर्व सभासद व कर्जदारांना बँके मार्फत जास्तीत जास्त सुविधा देण्याचा यापुढील काळात प्रयत्न राहील. बँकेच्या आर्थिक अडचणी संपत आल्या असून लवकरच बँक पूर्वपदावर येत आहे. आत्तापर्यंत जसे सहकार्य केले आहे, तसेच सहकार्य यापुढेही राहील; अशी आशा बाळगतो.

**...कन्हैयालाल देवी (चेअरमन - करमाळा अर्बन बँक)**

# पांडूरंग जोशी गुरूजी यांचा प्रथम पुण्यस्मरण दिन विविध सामाजिक उपक्रमाने साजरा



करमाळा(सं.प्र.) : किल्ला विभाग येथील रहिवाशी व जुन्या पिढीतील सेवानिवृत्त आदर्श शिक्षक तथा वेदशास्त्र तज्ञ पांडूरंग जोशी गुरूजी यांचा प्रथम पुण्यस्मरण दिन जोशी परिवाराच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला.

प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त श्रीराम प्रतिष्ठान संचलित अन्नपूर्णा योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरीक व निराधारांना अन्नदान करण्यात आले. तसेच पांजरापोळ संस्थेतील मुक्या जनावरांना चारा व घास वाटप करण्यात आला. तसेच श्रीदेवीचामाळ येथील मुकबधीर शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून भोजन देण्यात आले. यावेळी किराणा व्यापारी संतोषशेठ गुगळे, संजय शिंदे, निलेश जोशी, चैतन्य पाटील, पिंटू ननवरे, बबन पुतकर, अभिषेक आवाड, किरण बोकन, मारूती सुरवसे, शेखर जोगळेकर, गोरख जाधव, हरी पिंपळे, राहूल सोळंकी यांच्यासह जोशी परिवारातील पत्रकार अविनाश जोशी, गिरीश जोशी, संजय जोशी, सौ.मंजिरी जोशी, सौ.मोहिनी जोशी, सौ.प्रिती जोशी, रेखा जोशी, प्रज्ञा जोशी, सौ.अलका अशोक आवाड, राजाभाऊ जोशी, पत्रकार अनिल जोशी(चारे) आदीजण उपस्थित होते. जोशी परिवाराने वडीलांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमाचे करमाळा शहर व तालुक्यातून कौतूक होत आहे.

## मा.आ.नारायण पाटील यांच्या प्रयत्नातून
# सिमेंट रस्त्यासाठी ४६ लाख मंजूर



करमाळा(सं.प्र.) : माजी आमदार नारायण पाटील यांच्या प्रयत्नातून गावांतर्गत सिमेंट रस्त्यासाठी ४६ लाख रूपये मंजूर झाले असून पहिल्या यादीत दहा गावांचा समावेश आहे. माजी आमदार पाटील यांनी करमाळा मतदार संघातील गावांना गावांतर्गत सिमेंट रस्ते व बंदिस्त गटार या कामासाठी जनसुविधा योजनेतून पाच कोटी रूपये निधीची मागणी केली असून यातील पहिल्या यादीत दहा गावांना निधी मंजूर झाला. यामध्ये जेऊर (९ लाख), निंभोरे (३ लाख), वांगी नं.२ (३ लाख), भाळवणी (३ लाख), कविटगाव (३ लाख), कोंढेज (३ लाख), कुंभेज (३ लाख), जातेगाव (३ लाख), घारगाव (३ लाख), रोपळे (३ लाख) या गावांमधील सिमेंट रस्त्यासाठी निधी उपलब्ध झाला आहे. जेऊर गावासाठी नागरी सुविधा अंतर्गत दहा लाख रूपये मंजूर झाले आहेत. माजी आमदार नारायण पाटील यांच्या माध्यमातून जलजीवन योजना, जनसुविधा योजना व दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत निधीची मागणी केली असून लवकरच उर्वरित गावांना निधी मंजूर होणार आहे. पदावर नसतानाही माजी आमदार पाटील यांनी मतदार संघातील गावांना निधी मिळवून देण्यासाठी पाठपुरावा चालू ठेवला असून, यामुळेच करमाळा तालुक्यातील सर्वाधिक ग्रामपंचायतीवर पाटील गटाची सत्ता अबाधित आहे; असे पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर यांनी सांगितले.

# किरण वनारसे यांचे निधन



करमाळा : येथील कुमारी किरण सुशिल वनारसे (वय-१९) या युवतीचे अल्प आजाराने निधन झाले आहे. तिच्या मागे आई-वडील, आजी, बहिण, भाऊ असा परिवार आहे. किरण ही निरागस मुलगी म्हणून परिचीत होती. तिच्या निधनाने वनारसे परिवारावर दु:खाची छाया पसरली आहे.


॥ गण गण गणात बोते ॥

# श्री गजानन अगरबत्ती

सुगंधी अगरबत्ती, कापूर, अत्तर, धूप, आसन
गौरी गणपती हार, डेकोरेशन साहित्य, विविध कलरची रांगोळी
तसेच सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !





**पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर**
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)


# भावपूर्ण श्रध्दांजली !



अजय प्रिंटींग प्रेसचे मालक
**कै.राजशेखर षडाक्षरी पुराणिक**
यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.
त्यांच्या कुटूंबियाच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो, हीच आमची भावपूर्ण श्रध्दांजली !

शोकाकुल
• **समस्त चिवटे परिवार, करमाळा.**
• **चिवटे बंधू व चिवटे फॅमिली रेस्टॉरंट, करमाळा.**



जय महाराष्ट्र पतसंस्थेचे चेअरमन, क.न.प.चे नगरसेवक
श्री कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे संचालक
मा.हाजी अल्ताफशेठ तांबोळी
यांना दि.८ फेब्रुवारी रोजी असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा
मुस्लिम समाजाचे नेते
युवा नेतृत्व
शुभेच्छुक
मुस्लिम समाज
करमाळा शहर

# समाजकारणाबरोबर राजकारणात दबादबा असणारे नेतृत्व

# हाजी अल्ताफशेठ तांबोळी



करमाळा शहरातील मंगळवार पेठ मधील रूपचंद तालीम तरूण मंडळा पासून निर्माण झालेले वादल आज कमलादेवी औद्योगिक वसाहतीचे १९ वर्ष सदस्य, जय महाराष्ट्र मित्र मंडळाचे फाऊंडर मेंबर, जय महाराष्ट्र पतसंस्थेचे चेअरमन, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष, विद्यमान नगरसेवक, मुस्लिम समाजाचे आधारस्तभं, तंबाखुचे व्यापारी, कापडाचे व्यापारी, एम.आर.एफ टायर्सचे शोरूम, हाशमोद्दीन तांबोळी चॅरीटेबल ट्रस्ट चे संस्थापक आदी पदे कमी वयात भुषवून येथील सामाजिक व राजकीय व्यासपीठावर उत्तुंग झेप घेतली आहे.

वडील कै.हाशमोद्दीन तांबोळी यांचे आशिर्वाद व बाळकडू तसेच मुस्लिम समाजाचे नेते व थोरले बंधू उस्मानशेठ तांबोळी यांचे मार्गदर्शन व खंबीर साथ या जोरावर नगरसेवक अल्ताफशेठ तांबोळी यांचा सामाजिक व राजकीय घोडदौडीचा आलेख वरचेवर उंचावत चालला आहे. पुणे, मुंबईला न जाता श्री.तांबोळी यांनी करमाळा येथेच आपल्या व्यवसायात जम बसविला असून त्यांचा मित्र परिवार मोठा आहे. विशेष म्हणजे मुस्लिम समाजावर त्यांची चांगली पकड असून सर्वच जाती धर्मातील युवकांबरोबर त्यांची मैत्री आहे.

१९८४ सालापासून त्यांच्या सामाजिक कार्यास सुरूवात झाली. प्रथम रूपचंद तालीम तरूण मंडळाचे अध्यक्ष झाल्यानंतर त्यांचे थोरले बंधू उस्मानशेठ तांबोळी यांचे मार्गदर्शनाखाली त्यांनी आपल्या कार्यास सुरूवात केली. १९९० साली जय महाराष्ट्र मित्र मंडळाची स्थापना झाली. त्याचे ते फाऊंडर मेंबर आहेत. कॉलेज जीवनातही त्यांनी अनेक मित्र जोडले व त्या सर्वांच्या मदतीसाठी ते नेहमी पुढे आले आहेत. आदिनाथ कारखान्याचे विद्यमान चेअरमन संतोष पाटील यांना यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे यु.आर. करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांचे सारखे अनेक मित्रांना त्यांनी साथ दिली. राजकारणाचे बाळकडू त्यांना जय महाराष्ट्र मित्र मंडळाच्या माध्यमातूनच व बंधू उस्मानशेठ तांबोळी यांचे मार्गदर्शनातून मिळत गेले. राजकारणातील पहिली निवडणूक त्यांनी कमलादेवी औद्योगिक वसाहतीची लढविली. त्यावेळी वसाहती च्या जुन्या लोकांबरोबर त्यांचा लढा होता. तेथे ते निवडून येईल म्हणून कोणीही विश्वास ठेवत नव्हते. पण तरीही त्यांचा पॅनल निवडून आला. नगरपरिषदेच्या निवडणुकीतही ते दोन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले. राजकीय कामाबरोबरच तांबोळी यांना सामाजिक कामाची जास्त आवड आहे. वडील हाजी हाशमोद्दीन तांबोळी यांचे नावाने त्यांनी ट्रस्ट स्थापन केला असून, गरीब रूग्णांसाठी रूग्णवाहिका घेतली आहे. या रूणवाहिकेचा वापर ते फक्त समाजासाठीच करत नसून सर्व जाती धर्माच्या लोकांसाठी त्यांनी सेवा उपलब्ध केली आहे. जात हा विषय त्यांचेसमोर गौण असून फक्त समाजापुरते काम न करता या समाजातील सर्व लोक भारतीय आहेत व त्या भारतीयांचा मला अभिमान असून त्यांचे मी काहीतरी देणे लागतो; या विचारातून ते सामाजिक काम करत आहेत.

जातीभेद न ठेवता सर्व जातीधर्मातील २५ लग्न सोहळे करण्याचा त्यांचा मानस आहे. यापूर्वीही त्यांनी वधू-वर परिचय मेळावा घेतला होता. आत्तापर्यंत ज्यांना आई-वडील नाहीत अशा चार मुलींची लग्ने त्यांनी स्वखर्चाने केली आहेत. समाजामधील मुले अशिक्षित राहू नये व समाज शिक्षित व्हावा; यासाठी त्यांनी ट्रस्ट मार्फत गरीब विद्यार्थ्यांचा संपूर्ण शिक्षणाचा खर्च करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. जो व्यक्ती गोरगरीबांसाठी झटतो, काम करतो त्यांना तांबोळी यांचा पाठींबा असतो. मग तो कोणत्याही पक्ष किंवा पार्टीचा असो. सामाजिक कामात ते कोणतेही राजकारण आणत नाहीत. नेहमी अन्यायाविरूध्द लढण्याची त्यांची भुमिका आहे. अन्याय करणार नाही व कोणावर करू देणार नाही; हे त्यांचे ब्रीद वाक्य आहे.



विद्यार्थ्यांना चादर व ब्लँकेट वाटप करताना अल्ताफशेठ तांबोळी

उमरड येथे मुस्लिम समाज मोठा असून, या ठिकाणी मुस्लिम समाजाचे एका व्यक्तीचा दफनविधी करण्यासाठी तेथील समाजातीलच व्यक्तींनी विरोध केला होता. त्यावेळी तांबोळी यांनी स्वत: त्या ठिकाणी जाऊन हा प्रश्न सोडविला. मशिदीची ६५ एकर जागा असताना हा प्रश्न निर्माण झाला. या प्रश्नावर तांबोळी यांनी खोलात जाऊन अभ्यास केला व स्मशानभुमीसाठी जागा मिळवून दिली. यासारखे अनेक प्रश्न त्यांनी सोडविले आहेत. पंढरपूर यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांना ते दरवर्षी फराळाचे वाटप करतात. तसेच गुजरात येथील एका दिंडी सोहळ्याची मुक्कामाची व जेवणाची सुविधा त्यांचेकडे असते.तसेच रमजान ईदच्या काळातही मुस्लिम समाजाला ते मोफत दुधाचे वाटप करतात. मुकबधीर शाळेत टी-शर्ट व स्पोर्टस् चे किट वाटप, मदरसा शाळेतील विद्यार्थ्यांना चादर व स्वेटर वाटप, रमजान ईद निमित्त विविध साहित्याचे वाटप, दिवाळीत हिंदु समाजातील नागरीकांना फराळाचे वाटप तसेच मुस्लिम समाजातील नागरीकांसाठी मोफत खतना कॅम्प शिबीराचे आयोजन श्री.तांबोळी करतात.

कोरोनाच्या काळात करमाळा शहरातील नगरसेवकांमध्ये श्री.तांबोळी यांनी सर्वात जास्त काम व मदत केली आहे. या काळात सर्व समाजातील गोरगरीबांना मोफत धान्य वाटप केले असून सॅनिटायझर, हॅन्डवॉश वाटप केले आहे. तसेच हजारो मास्कचे वाटपही केले आहे. तसेच किराणा मालाचे कीटही वाटप केले आहे.

राजकारणाबरोबर समाजकारणातही श्री.तांबोळी यांनी आघाडी घेतली आहे. आपण जेवढे कमवतो, त्यातील थोडातरी हिस्सा समाजसेवेसाठी ते खर्च करतात. समाजात पैशावाले भरपूर आहेत, पण ते समाजासाठी खर्च व वेळ देतील; अशी माणसे बोटावर मोजण्या एवढीच सापडतील. त्यात तांबोळी यांचा समावेश आहे. त्यांचा स्वभाव कडक आणि तेवढाच शांत आहे. नेहमी त्यांची समजुतदारपणाची भुमिका राहिली आहे. समजुतीने काही प्रश्न मिटत नसतीलतर जशास तसे उत्तर देण्याचीही ताकद त्यांचेकडे आहे. त्यामुळे त्यांचे नेतृत्व हे सर्वांना आपलेसे वाटत आहे. अशा या हरहुन्नरी व्यक्तीमत्वचा ८ फेब्रुवारी २०१८ रोजी वाढदिवस आहे. त्यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

**...जमीर सय्यद, करमाळा.**

***


यशवंत क्लासेस करमाळा
श्रेयातूर जीवन विकास
यशवंत क्लासेस्
करमाळा, जि.सोलापूर
११ वी व १२ वी PCMB बोर्ड
MHT-CET / NEET / JEE
2023-24
प्रवेश
सुरू
१२ वी
रेग्युलर फ्री डेमो
क्लासेस
५ फेब्रु. २०२३
पासून
"5 + 2 FORMULA"
(5 Days Board + 2 days MHT-CET / NEET / JEE)
आपला प्रवेश आजच निश्चित करा !
यशवंत मध्ये प्रवेश घ्या आणि यशवंत व्हा !
Contact
9767240192, 9850979486, 9322903010, 7517960426
पत्ता : क्षीरसागर बिल्डींग, शिवाजीनगर, करमाळा.


6 Feb
आधारस्तंभ
3 Feb
यशवंत परिवाराचे आधारस्तंभ,
विद्या विकास मंडळाचे सचिव
मा.श्री.विलासराव घुमरे(सर)
व आमचे मित्र
प्रा.श्रीकांत कांबळे (सर)
यांना वाढदिवसाच्या लाख.. लाख.
हार्दिक
शुभेच्छा !
चेअरमन
शुभेच्छुक
प्रा.हनुमंत भोंग
प्रा.राहूल श्रीरामे
प्रा.एम.डी.जाधव
श्री.गणेश जाधव
श्री.गणेश वळेकर


6 Feb
विश्वस्त
अध्यक्ष, विद्या विकास मंडळ
प्राचार्य
विद्या विकास मंडळाचे सचिव
व आमचे मार्गदर्शक
उपप्राचार्य
मा.श्री.विलासरावजी
घुमरे (सर)
यांना दि.६ फेब्रुवारी रोजी असलेल्या
६८ व्या वाढदिवसानिमित्त
पर्यवेक्षक
हार्दिक
शुभेच्छा
प्रा.आर.ए.व्यवहारे
शुभेच्छुक
व्यवहारे परिवार
करमाळा., जि.सोलापूर


हार्दिक शुभेच्छा
आमचे मार्गदर्शक
मा.विलासरावजी
घुमरे(सर) यांना
६८ व्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा !
कॅप्टन/उपप्राचार्य संभाजी किर्दाक सर
लेफ्टनंट डॉ.विजया गायकवाड(सोनवणे)
श्री.निलेश भुसारे (सीटीओ)
शुभेच्छुक
एन.सी.सी.विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा.

# शेतकरीही महाल बांधू शकतो..!

मुकेश अंबानी यांचे मुंबई येथे घर आहे. त्याचे नाव 'अँटीलिया' असे आहे. त्या घराचे क्षेत्रफळ ४००००० चौ.फुट आहे. एकूण २७ मजले असून त्यात १६८ कार साठी ७ मजले कार पार्कींग आहे, ५० लोकांची क्षमता असलेले चित्रपटगृह, ३ हॅलीपॅड, हँगीग गार्डन आहे, स्विमींगपुल,बॉलरूम,२ मजली हेल्थ सेंटर, मंदिर. येथे ६०० कर्मचारी काम करतात. या घराचे बांधकाम सन २००६ ला सुरू होवून २०१० मध्ये पुर्ण झाले आहे. याघराच्या बांधकामाची किमंत १५००० कोटी रूपये आहे. हे घर केवळ मुंबईच नाही, महाराष्ट्रच नाहीतर संपुर्ण देशातले जास्त किमंतीचे घर आहे. अंबानी हे उद्योजक आहेत. देशात आणि जगात सतत श्रीमंताच्या यादीत पहिल्या पाच क्रमांत असतात. त्यांनी महागडा बंगला बांधला तर विशेष नाही पण शेतकरी असा बंगला बांधु शकेल का? हा खरा प्रश्न आहे. शेतकऱ्याला अनंत अडचणी आहेत. निसर्गाचे दुष्टचक्र,बाजारभावाची हेळसांड, कामगारांचे प्रश्न अशा अनंत अडचणीत असणारा शेतकरी कसाबसा प्रपंच रेटत रहातो. पण जर शेतकरी काटकसरी, बाजारात काय विकतं तेच विकवणारा असेल, निर्व्यसनी असेल आणि कारण नसताना कोणताही प्रश्न प्रतिष्ठेचा करत नसेल तर शेतकरी कणखरपणे उभा राहू शकतो आणि अशी वास्तु उभा करू शकतो.



गेल्या आठवड्यात बिटरगाव (वांगी) येथे संत रघुराजा महाराज यांच्या पायी दिंडी सोहळा प्रस्थानला जाण्याचा योग आला. ह.भ.प. रामभाऊ महाराज निंबाळकर व ह.भ.प. अनिरूध्द महाराज निंबाळकर यांनी विशेष आमंत्रण दिले होते. सोबत यशकल्याणीचे अध्यक्ष प्रा. गणेशभाऊ करे-पाटील व युवा नेते शंभुराजे जगताप होते. दिंडी सोहळा प्रस्थानचा कार्यक्रम संपल्यावर परतीच्या प्रवासाला निघालो असताना , रस्त्यात केळी उत्पादक संघाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील यांचे घर लागते. त्यांच्या घराची काही दिवसापुर्वीच वास्तुशांती झाली पण त्यावेळी जाता आले नाही म्हणून आम्ही तिघांनीही त्यांच्या घराला भेट देण्याचे ठरवले. त्यानुसार आम्ही तिथे जातो न जातो तोपर्यंत श्री. पाटील व त्यांचे बंधू संतोष पाटील यांनी रस्त्यावर येवूनच स्वागत केले. त्यांच्या घराकडे गेल्यानंतर समजले, की हे घर, बंगला की महाल नेमका कोणता शब्द वापरावा.. अतिशय भव्य, प्रशस्त आणि सुंदर बांधणीचे हे घर आहे. अतिशय मन लावून व वेळ देवून तसेच कारागीरांना पारखून त्यांच्याकडून हे काम करून घेतल्याचे जाणवले. निसर्गाच्या सानिध्यात या वास्तुचे मोल हे अनमोल आहे. उजनीपासून अवघ्या १००-१५० फुटावर असलेली ही वास्तु मनमोहक आहे. बाजूला हिरवा शालू पांघरलेली भुमी आकर्षक आहे. थोडक्यात निसर्गाने नटलेल्या सौंदर्यखाणीत हा महाल थाटलेला आहे. बांधकाम करताना तिथे कल्पकता तसेच जुने-नवे याचा संगम आहे. दरवाजे, खिडक्या, देवघर, हॉल, बेडरूम व अन्य आकर्षक सुविधा महत्वाच्या आहेत. आतील फर्नीचर असो नाहीतर विद्युतीकरण असो नाहीतर रंगसंगती असो आकर्षक आहे. या महालात प्रवेश केलेल्या व्यक्तीला आकर्शीत करणारी ही वास्तु आहे. बांधकामाचा हिशोब करता जवळपास पावणे दोन कोटी पर्यंत खर्च झालेला आहे. पण वास्तु ही पाहणाऱ्याच्या मनात घर करणारी आहे. विशेष म्हणजे एक शेतकरी राजा अशी वास्तु उभी करतो हे सर्वात महत्वाचे विशेष आहे. त्यामुळे पाटील परिवाराचे मनापासून अभिनंदन..!

## कलिम काझी यांचा सत्कार



करमाळा(सं.प्र.) : करमाळा मुस्लिम समाजातील समाजसुधारक व विचारवंत कलिम काझी यांची करमाळा अर्बन बँकेच्या संचालक पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल भारतरत्न डॉ.एपीजे अब्दुल कलाम फाऊंडेशन व मुस्लिम समाज करमाळा यांच्या तर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना काझी म्हणाले, की करमाळा अर्बन बँके मार्फत गेल्या पंचवार्षिक संचालक पदाच्या कार्यकाळात अनेक युवकांना स्वयंरोजगार चालू करण्यासाठी, उद्योगधंदे सुरू करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून दिली आहेत. युवकांनी आपल्याकडे असणारे कौशल्य गुणांचा वापर करून किंवा पाच ते दहा युवकांनी एकत्र येऊन नवीन उद्योगधंदे सुरू करावे. त्यासाठी लागणारे भांडवल हे करमाळा अर्बन बँक व बँकेचे चेअरमन कन्हैयालाल देवी यांच्या मार्फत शंभर टक्के उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न राहील. तसेच करमाळा अर्बन बँकेला गतवैभव मिळवून देण्याचा मानस काझी यांनी व्यक्त केला.

यावेळी समीर शेख, पिंटूशेठ बेग, जामा मस्जिदचे विश्वस्त जमीर सय्यद, सूरज शेख, जहाँगीर शेख, फिरोज बेग, आझाद शेख, ईमत्याज पठाण, मुस्तकीम पठाण, इक्बाल शेख व मुस्लिम समाजातील युवक उपस्थित होते.




Boos
6 Feb
चेअरमन
व्हा.चेअरमन
सचिव
आमचे मार्गदर्शक
मा.श्री.
विलासरावजी घुमरे सर
आपणांस 68 व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा !
तसेच पतसंस्थेच्या नूतन चेअरमन पदी
मा.श्री.चंद्रशेखर शिलवंत सर यांची तर व्हा.चेअरमन पदी
अ‍ॅड.विक्रांत घुमरे यांची निवड झाल्याबद्दल तसेच
सर्व नूतन संचालकांचे हार्दिक अभिनंदन !
राजेंद्र इंदुरे
शंकर कुलकर्णी
विनय ढाळे
यासीन सय्यद
संजय दिवाण
धीरज सोळंकी
सचिन कुलकर्णी
महेश गवळी
शंकर घनवट
संतोष बालगुडे
किशोर नरारे
वैभव गवळी
रवि कुलकर्णी
जितेंद्र क्षीरसागर
शुभेच्छुक
श्री विलासराव घुमरे नागरी सह.पतसंस्था मर्या; करमाळा
(सर्व पिग्मी एजंट व स्टाफ)